पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/९/कावि/ ९७७/२०१०
दिनांक : ८/७/२०१०

प्रति,

मा..................................
सदस्य, विधी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

विषय : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा दिनांक १६/७/२०१० रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक १६/७/२०१० रोजी दुपारी २:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत : १) सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८

मा. विधी समिती

<u>कार्यपत्रिका क्रमांक : २</u>

दिनांक : १६/७/२०१० वेळ : दुपारी २ :०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार, दिनांक १६/७/२०१० रोजी दुपारी २:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

अ) दिनांक १८/६/२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २४ ) सभावृत्तांत कायम करणे.

ब) दिनांक ६/७/२०१० रोजी झालेल्या विशेष सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १ ) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक :- १) भोसरी स.नं. २२७/१ (राधानगरी सोसायटीजवळ) मोकळ्या जागेत उद्यान विकसित करणेकामी र.रु.२४,९९,०००/- चे खर्चास प्रशासकिय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- २) मनपाच्या यशवंतराव चव्हाण रूग्णालयाचे पोस्ट मार्टेम सेंटरकरिता वैद्यकीय अधिकारी या अभिमानाची पदे शासन मंजूर असून कामकाज समाधानकारक असल्याने व सेवेची महापालिकेस आवश्यकता असल्याने डॉ. रोकडे पी.डी. यांना दिनांक १३/११/२००९ पासून ०१ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास व डॉ. सोनवणे एम.व्ही. व डॉ. मदने एस.सी. यांना दि. २५/८/२००९ पासून पुढे ०१ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ३) वॉर्ड क्र. ६ चिखली चौकामध्ये नविन शाळा इमारत बांधणेकामी र.रु. ३६,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ४) चिखली मैला शुध्दीकरण केंद्र अंतर्गत सिमाभिंत बांधणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी र.रु. ४८,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ५) वाल्हेकरवाडी येथील शाळा इमारतीच्या दुस-या मजल्याचे बांधकाम रद्द करून स्थानिक नगरसदस्यांनी केलेल्या मागणीनुसार कामाच्या स्वरूपात बदल करून वाल्हेकरवाडी येथील शाळा इमारतीच्या दुस-या मजल्याचे विस्तारीकरण करणे या कामाच्या ऐवजी निविदेअंतर्गत वाल्हेकरवाडीमधील मनपाचे शाळा व दवाखाना इ. इमारतीचे मजबुतीकरण, डागडुजी व इतर स्थापत्य विषयक कामे करणेचे प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे. (अंदाजपत्रकीय र.रू. २९,११,४००/-)

विषय क्रमांक :- ६) कामाच्या जागेत बदल होत असलेने वॉर्ड क्र. ३३ ऐवजी वॉर्ड क्र.३१ मध्ये जलवाहिन्या टाकणेचे काम मनपाकडील स्विकृत निविदा क्र. ६/५ - २००७/०८ मधून करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे. ( र.रू. २० लाख )

विषय क्रमांक :- ७) पुणे महानगर नियोजन समितीच्या दैनंदीन कामकाज व कार्यालय स्थापनेचा खर्च हा सुमारे ३८६ लक्षपैकी अर्धा हिस्सा सुमारे १९३ लक्ष पिं.चिं.मनपास द्यावा लागणार असून नविन कार्यालयाच्या वेतन व भत्यावरील खर्च व इतर खर्चासाठी महानगरपालिकेची मान्यता / सहमती बाबतची अपेक्षित माहिती तातडीने पाठविणेबाबत कळविले असल्याने सदर बाब ही आर्थिक बाबीशी निगडीत असल्याने मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८ नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/९/कावि/ ९७७/१०
दिनांक : ८ /०७/१० चे लगत

टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.